# चमत्कारांचे विज्ञान

एष तु वा अतिवद्ति यः सत्येनातिवदति।
यदा वै विजानाति अथ सत्यं वदति। छांदोग्य उप. ७.१६.१७
**अर्थ :** हा (ग्रंथ) अतिवादी आहे. म्हणजे तो व्यवहारापलीकडील गोष्टी सांगतो, पण तो व्यवहारापलीकडील गोष्टी सत्य असल्यामुळे सांगतो. आणि सत्य केवळ विज्ञान जाणणाराच सांगू शकतो.

**प्रा. अद्वयानंद गळतगे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**चमत्कारांचे विज्ञान**
प्रा. अद्वयानंद गळतगे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रा. अद्वयानंद गळतगे
पो. भोज, ५९१२६३
जि. बेळगावी
मो. नं. : ०९९०२००२५८५

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ५००/-

# *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| | **चमत्कारांचे विज्ञान** | ७ |
| १. | विज्ञान आणि ‘चमत्कार’ यांच्यात खरोखर विरोध आहे काय? | ८ |
| २. | तथाकथित ‘चमत्कारां’चे वैज्ञानिक संशोधन | १८ |
| ३. | भौतिक जगात दडलेली व संकटकाळी प्रकट होणारी अतींद्रिय शक्ती | २१ |
| ४. | संदेश देण्यासाठी प्रकट होणारी अतींद्रिय शक्ती | २४ |
| ५. | शरीरद्वारा प्रकट होणारी अतींद्रिय शक्ती | ३० |
| ६. | भौतिक जग व ‘चमत्कारां’चे जग यामध्ये सीमारेषा आहे काय? | ३७ |
| ७. | ‘चमत्कार’ आणि ईश्वर | ४४ |
| ८. | ‘डोळसपणा’ आणि ‘आंधळेपणा’ यांची शास्त्रीय व्याख्या | ४७ |
| ९. | काही अशक्य कोटीतील अतींद्रिय घटना | ५० |
| १०. | अन्नपाण्याशिवाय जगणारी माणिक्यम्मा | ५२ |
| ११. | ‘मनुष्य हा देह नाही, आत्मा आहे’, हे सिद्ध करणारी गिरिबाला | ५५ |
| १२. | मनुष्य देह नाही, आत्मा आहे हे सिद्ध करणारे आणखी ‘चमत्कार’ | ५८ |
| १३. | श्रद्धारूपी अन्नावर जगलेली थेरेसा न्यूमन | ६२ |
| १४. | तेलाशिवाय ३५ वर्षे जळणारे तीन कंदील | ६५ |
| १५. | शस्त्र न चालू शकलेली बळीची बकरी | ७४ |
| १६. | अतींद्रिय शक्तीची विविध रूपे | ७८ |
| १७. | अतींद्रिय दृष्टी, संमोहन आणि पुनर्जन्म संशोधन | ११८ |
| १८. | आकाशलेखन (Akashic Record) | १२५ |
| १९. | थिऑसाफी, भगवद्गीता आणि योगसिद्धी | १२७ |
| २०. | ब्रह्मविद्या, भानामती आणि विज्ञान | १३१ |
| २१. | मॅडम ब्लॅव्हेट्स्की यांचे काही चमत्कार | १३७ |
| २२. | संकल्पशक्तीचा एक ‘चमत्कार’ | १४४ |
| २३. | मॅडम ब्लॅव्हेट्स्की यांची भानामती | १४६ |
| २४. | मॅडम ब्लॅव्हेट्स्की यांची कृत्रिम मृतात्मा (भूत) | १४९ |

२५. ब्लव्हेट्स्की यांची 'यक्षिणी विद्या' १५०
२६. 'मानसलेखन' व 'आकाशलेखन'विषयक 'चमत्कार' १५२
२७. भानामतीची मीमांसा १५६
२८. नरसोबावाडीतील दत्तमंदिराच्या पूजाऱ्याच्या घरी भानामती १५९
२९. विविध रूपांनी भेटणाऱ्या निसर्गदेवता १६३
३०. अस्तित्वात नसलेल्या ओढ्यात अंघोळ १६९
३१. 'आज्ञाधारक भानामती' अर्थात् जादू १७४
३२. ईश्वर-गारुड्याची विश्वनिर्मितीची जादू १७५
३३. भानामती, जादू व विश्वनिर्मिती यातील साम्य १७८
३४. ऑलकॉट यांचे संपूर्ण हृदयपरिवर्तन करणारा एक 'चमत्कार' १८३
३५. आकाशगमनाची सिद्धी १८३
३६. स्थूल देहानेही आकाशगमन होते? १८६
३७. 'चमत्कारां'चा (वेदांती) निषेध १८७
३८. एकाचवेळी 'चमत्कार' हे खरे आणि खोटे, हे कसे? १९१
३९. अदृश्य पातळीवरून मदत १९३
४०. वस्तू 'अदृश्य' कशी करता येते? १९४
४१. अस्तित्वात नसलेली वस्तू दृश्य करता येते? २००
४२. दृश्यरूप धारण करणारी 'कृत्रिम भानामती' २०३
४३. जिवंत माणसांच्या वासना 'पिशाच्च' बनतात २११
४४. कर्मणो गहना गति: २१४
४५. गणपतीचा 'चमत्कार' २१८
४६. गणपतीचा असाही एक अनुभव २२२
४७. प्राणीहत्या निषिद्ध असलेल्या देवता २२३
४८. पाश्चात्त्यांच्या आधुनिक पुराणकथा अर्थात् UFO (उडणाऱ्या बशा) २२५
४९. 'यूफो' कथा म्हणजे नव्या बाटलीतील जुनीच दारू २२९
५०. पुराणे ही माणसाची भावनिक गरज २३४
५१. 'यूफो' व भानामती यामधील काही साम्ये २३८
५२. 'यूफो', मरणानुभव आणि मानवाचे आध्यात्मिक पुनरूत्थान २४०
५३. देवदूत : आणखी एक पाश्चात्त्यांचे पुराण २४४
५४. नवस न फेडल्याचा परिणाम २४८

| | | |
|---|---|---|
| ५५. | कर्मदेवता, लोकपाल आणि विश्वव्यवस्था | २५१ |
| ५६. | कर्म, कर्मफल आणि विधिलिखित | २५२ |
| ५७. | विधिलिखित आणि मानवाचे इच्छास्वातंत्र्य | २५६ |
| ५८. | 'ईश्वरेच्छे'विरुद्ध एक संभाव्य आक्षेप | २६५ |
| ५९. | अर्थपूर्ण घटना (Synchronicity) : .... | २६७ |
| ६०. | खरी ठरलेली भविष्यसूचक स्वप्ने व भाकिते :.... | २९५ |
| ६१. | नाडी भविष्य : 'आकाशलेखना'चा तिसरा व निर्णायक पुरावा | ३०५ |
| ६२. | मानवाचे 'इच्छास्वातंत्र्य' हे ईश्वराचेच 'इच्छास्वातंत्र्य' | ३११ |
| ६३. | कार्यकारणभाव आणि 'अर्थपूर्ण' घटना : भौतशास्त्रीय चिकित्सा | ३१७ |
| ६४. | जड-चेतनामधील क्वाँटम अभेदत्व | ३२७ |
| ६५. | क्वाँटम सिद्धांत आणि विश्वाचे अखंडत्व | ३३३ |
| ६६. | विश्वाचे नियम कोणाकडून वा कसे निर्माण होतात? | ३४३ |
| ६७. | क्वाँटम सिद्धांत आणि नियतीवाद | ३५२ |
| ६८. | क्वाँटम सिद्धांत आणि परामानसशास्त्र | ३५५ |
| ६९. | विज्ञान आणि अध्यात्म | ३६८ |
| ७०. | समारोप | ३७२ |
| ७१. | टीप | ३७४ |
| ७२. | संदर्भ व टीपा | ३७६ |

✦✦✦

# चमत्कारांचे विज्ञान

*यदा वै विजानाति अथ सत्यं वदति ।*
*न अविजानन् सत्यं वदति ।*
*विज्ञानं तु एव विजिज्ञासितव्यम् ।।*
*– छांदोग्य उप.*

विज्ञान आणि चमत्कार या परस्परविरुद्ध संकल्पना असल्याची रूढ विज्ञानाच्या दृष्टिकोनातून जगाकडे पाहणाऱ्यांची धारणा आहे. म्हणजे असे की, विज्ञान खरे असेल (आणि विज्ञानाला खोटे कोण म्हणेल?) तर चमत्कार खोटे व चमत्कार खरे असतील तर विज्ञान खोटे, अशी या रूढ विज्ञानवाद्यांची याविषयीची भूमिका असते. तीनशे वर्षांपूर्वी युरोपात जन्मलेल्या या कल्पनेनुसार हे दृश्य जग काही विशिष्ट भौतिक नियमांवर आधारलेले असून त्या नियमांपलीकडे कसलेही नियम या विश्वात अस्तित्वात नाहीत; दुसऱ्या शब्दात या दृश्य जगाचे स्वरूप शुद्ध भौतिक आहे, असे हे रूढ विज्ञानवादी मानतात. कदाचित विश्वात भौतविज्ञानाच्या कक्षेत न येणारे काही नियम असतील, म्हणजेच या विश्वाचे मूलभूत स्वरूप भौतविज्ञान समजते त्याहून भिन्न असणे शक्य आहे आणि तसे ते असेल तर ते स्वरूप व त्या स्वरूपाच्या जगाचे नियम शोधण्याचे काम भौतविज्ञानाच्या कुवतीपलीकडचे वा कक्षेबाहेरचे आहे, ही गोष्ट हे रूढ विज्ञानवादी मान्य करीत असतील अशी कोणी कल्पना करील; पण अशी कोणी कल्पना करू नये. या रूढ विज्ञानाची तरफदारी करणारे लोक ही शक्यता तत्काळ फेटाळून लावतात. आपल्या विज्ञानाच्या कक्षेबाहेर, म्हणजे त्याला न समजणारे व न सापडणारे असे काही नियम, असे काही तत्त्व वा 'सत्य' या विश्वात दडले आहे, हे रूढ विज्ञानवादी मान्य करीत नाहीत. दुसऱ्या शब्दात, या विश्वाचे स्वरूप मूलत: व तत्त्वत: शुद्ध भौतिक आहे आणि हेच या विश्वाविषयीचे निरपेक्ष 'सत्य' आहे, अशी या रूढ विज्ञानवाद्यांची ठाम भूमिका व श्रद्धा आहे.

या संदर्भात दुसरी एक लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे आपल्या विज्ञानाने शोधून काढलेले हे भौतिक नियम अनुल्लंघनीय आहेत, असेही या रूढ विज्ञानवाद्यांचे म्हणणे असते. म्हणजे ज्यांना 'चमत्कार' समजण्यात येते ते खोटे आहेत, तसे प्रकार घडत

नाहीत असे ते म्हणतात. कारण भौतविज्ञानाच्या नियमांचे उल्लंघन म्हणजे 'चमत्कार' अशी त्यांची 'चमत्कारा'विषयीची धारणा आहे. या नियमांचे उल्लंघन अशक्य असल्याने या दृष्टिकोनानुसार 'चमत्कार' अशक्य ठरतात. त्यामुळे अशा घटनांवर विश्वास ठेवणारे लोक स्वाभाविकच अंधश्रद्धाळू ठरतात. विज्ञानाचा मानवी जीवनावर हल्ली इतका जबरदस्त परिणाम झाला आहे (विज्ञानाने केलेल्या नेत्रदीपक भौतिक प्रगतीमुळे व त्याने निर्माण केलेल्या अभूतपूर्व सुखसोईंमुळे हा प्रभाव पडलेला आहे) की विज्ञान हे हल्लीच्या जगाचा नवा 'धर्म' बनला आहे आणि हे वैज्ञानिक या नव्या 'धर्मा'चे श्रेष्ठ पुरोहित (high priests) बनले आहेत. त्यामुळे पूर्वीच्या धार्मिक समाजातील पुरोहिताप्रमाणे या नव्या वैज्ञानिक समाजाचे हे नवे पुरोहित जे काही सांगतील, ते सर्व 'सत्य' असते असे सामान्य मनुष्य समजतो व ते डोळे झाकून स्वीकारतो; पण त्यामुळे त्याच्यापुढे एक मोठाच पेचप्रसंग निर्माण होतो. कारण या विज्ञानाच्या नियमांचे 'उल्लंघन' करणाऱ्या एखाद्या घटनेचा अनुभव आपल्या जीवनात एकदा तरी त्याला आलेला असतो किंवा तो आलेला नसेल तर आपल्या परिवारातील किंवा परिचयातील एखाद्या व्यक्तीला असा अनुभव आल्याचे त्याने ऐकलेले असते किंवा त्याला ते माहीत असते. त्यामुळे हे रूढ विज्ञान खरे की हे चमत्कार खरे (त्यांचा अनुभव खरा) असा पेचप्रसंग त्याच्यापुढे निर्माण होतो. त्याची मन:स्थिती द्विधा बनते. क्वचित त्याचा बुद्धिभेदही होतो. म्हणजे असे की, एक तर त्याचा देवाधर्मावरचा विश्वास उडतो किंवा विज्ञानावरचा तरी विश्वास उडतो. (हे ज्याच्या त्याच्या अनुभवावर व मन:पिंडावर अवलंबून असते.) कारण कोणालाही मनाच्या (वा बुद्धीच्या) द्विधा (वा दोलायमान) अवस्थेत फार काळ राहणे शक्य नसते. स्वत: वैज्ञानिकांनाही ते शक्य नसते. कारण तीही शेवटी माणसेच आहेत.

मात्र येथे लक्षात ठेवायची गोष्ट अशी, की या परिस्थितीला (वा पेच प्रसंगाला) देवधर्मही जबाबदार नसतात व विज्ञानही जबाबदार नसते, तर त्या दोन्हीकडे पाहणाऱ्या माणसाचा दृष्टिकोन, त्याचे तत्त्वज्ञान जबाबदार असते.

–आणि हे तत्त्वज्ञान खोटे असते, अवैज्ञानिक असते. ते कसे हे समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

## विज्ञान व 'चमत्कार' यांच्यात खरोखर विरोध आहे काय?

'चमत्कार' खरे मानायचे की विज्ञान खरे मानायचे हा प्रश्न खरे तर 'बुद्धिवाद' नावाच्या खोट्या तत्त्वज्ञानामुळे निर्माण होत असून तो प्रश्न मुळातच भ्रामक आहे.

विज्ञानविषयक चुकीच्या कल्पनेतून तो निर्माण झाला आहे. काही वैज्ञानिकांनी स्वत:च्या विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या दावणीला विज्ञानाला बांधल्यामुळे तो निर्माण झाला आहे. हे वैज्ञानिक लोक बुद्धिवादी (वा भौतिकवादी) म्हणून ओळखले जात असून ते समजतात, की विज्ञान फक्त दृश्य भौतिक जगाचाच अभ्यास करते; पण विज्ञानाचा अभ्यास-विषय दृश्य भौतिक जगच का असावे, इतर विषय त्याला वर्ज्य का असावेत याचे समर्पक उत्तर ते देऊ शकत नाहीत आणि त्याचे समर्पक उत्तर त्यांना देता येत नसल्यामुळे हे जग शुद्ध भौतिक (वा दृश्य) आहे, हा (विज्ञानाचा अभ्यासविषय दृश्य भौतिक जगापुरता मर्यादित करून त्यांनी काढलेला) निष्कर्ष शुद्ध अवैज्ञानिक व पूर्वग्रहयुक्त ठरतो. विज्ञानाच्या इतिहासाच्या अज्ञानाचेही तो द्योतक ठरतो. कारण विज्ञानाच्या इतिहासाकडे पाहिले, तर विज्ञान दृश्य भौतिक जगाचाच फक्त अभ्यास करते या समजुतीला कसलाही आधार सापडत नाही.[१] कोणत्याही विषयाचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने करता येतो – कोणताही विषय विज्ञानाला वर्ज्य नाही, असे विज्ञानाचा इतिहास सांगतो. उदा. जीव (Life) हा विज्ञानाचा अभ्यासविषय होऊ शकत असल्याचे जीवशास्त्राचा (biology) इतिहास सांगतो. मन (Mind) हा विज्ञानाचा अभ्यासविषय होऊ शकत असल्याचे मानसशास्त्राचा (Psychology) इतिहास सांगतो. त्याचप्रमाणे अतींद्रिय घटना (तथाकथित 'चमत्कार') हाही विज्ञानाचा अभ्यास विषय होऊ शकत असल्याचे परामानसशास्त्राचा (Parapsychology) इतिहास सांगतो.[२]

अशा रीतीने विज्ञानाचा अभ्यासविषय कोणताही होऊ शकत असल्यामुळे विश्वाचे स्वरूप अमुकच आहे असा आग्रह बुद्धीला विशिष्ट तत्त्वज्ञानाची झापडे लावून विज्ञानपद्धती विशिष्ट विषयापुरती मर्यादित करणाऱ्या लोकांशिवाय इतर कोणीही धरणार नाही. जे लोक या विश्वाचे स्वरूप शुद्ध भौतिक आहे असे म्हणतात, ते विज्ञानपद्धती भौतिक जगापुरती मर्यादित करून संकुचित (म्हणजे बुद्धिवादी) तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून म्हणतात. वैज्ञानिक पद्धतीने या जगाचे सर्व बाजूंनी संशोधन करून तसे ते सिद्ध झाले आहे म्हणून म्हणत नाहीत आणि म्हणून वैज्ञानिक पद्धतीने भौतिक जगाचेच फक्त संशोधन करता येते असे अगोदरच ठरवून हे जग शुद्ध भौतिक असल्याचा निष्कर्ष काढणे हा एक आडमुठा व पूर्वग्रहयुक्त दृष्टिकोन तर ठरतोच; पण तो विज्ञान पद्धतीशी विसंगतही ठरतो. त्या पद्धतीशी ती एक (वैज्ञानिक) प्रतारणा ठरते; पण ही विज्ञानपद्धतीशी प्रतारणा नसून तिच्याशी एकनिष्ठताच कशी आहे हे दाखवण्याकरिता काहीजण (उदा. मार्टिन गार्डनरसारखे अमेरिकन बुद्धिवादी) आपल्या ठिकाणी हा बुद्धिनिष्ठ पूर्वग्रह असल्याचे प्रांजळपणे मान्य करून व दिखाऊ 'सत्यनिष्ठा' दाखवून बेसावध वाचकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा अश्लाघ्य प्रयत्न करताना दिसतात. (त्याचे Fads and Fallacies

in Science हे पुस्तक पाहा.) त्यांच्या या बौद्धिक कावेबाजपणाला महाराष्ट्रातील 'विज्ञानानंद' या नावाने प्रसिद्ध असलेले व अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांचे पितळ एके काळी जाहीरपणे उघडे पाडणारे लोणावळ्याचे एक नाणवलेले विचारवंतही बळी पडल्याचे दिसून येते. यावरून हे बुद्धिवादी धूळफेकीच्या या कसबात किती तरबेज आहेत याची वाचकांना कल्पना येईल.[३] पण प्रांजळपणाच्या – तोही धूळफेकीच्या धूर्त उद्देशाने स्वीकारलेल्या – गुणामुळे अवैज्ञानिकपणाचा दोष लपून राहत नाही. प्रांजळपणा म्हणजे सत्यनिष्ठा नव्हे आणि 'तत्त्वज्ञान' म्हणजे 'विज्ञान' नव्हे. खरी वैज्ञानिक दृष्टी बाळगणारा कोणीही शास्त्रज्ञ स्वत:ला कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या दावणीला कधीही बांधून घेत नाही. जो बांधून घेतो तो 'शास्त्रज्ञ' म्हणवून घेण्यास पूर्ण अपात्र ठरतो. विज्ञानाचा संबंध कुठल्याही तत्त्वज्ञानाशी नाही, तर केवळ वास्तवाशी (Fact शी) आहे व वास्तवांना स्वत:चे कसलेही तत्त्वज्ञान नसते. ती केवळ वास्तवे असतात – उघडीबोडकी. म्हणून टी. एच्. हक्सले याने म्हटले आहे की, शास्त्रज्ञांनी एखाद्या लहान बालकांप्रमाणे वास्तवापुढे बसावे. (Sit before the facts like a child) पण दुर्दैवाने काही शास्त्रज्ञांना लहान बालक बनता येत नाही व ते 'चमत्कारां'कडे बुद्धिपुरस्सर डोळेझाक करतात; पण 'चमत्कारां'कडे डोळेझाक केल्याने 'चमत्कार' 'अवास्तव' ठरत नाहीत. त्याकडे डोळेझाक करणारे मात्र अवैज्ञानिक ठरतात. 'वास्तवे' कशी असावीत हे बुद्धिवाद ठरवू शकत नाही. कोणताही 'वाद' वा 'तत्त्वज्ञान' ते ठरवू शकत नाही. केवळ त्यांचे नि:पक्ष व पूर्वग्रहविरहित दृष्टीने केलेले वैज्ञानिक संशोधनच त्यांचे खरे स्वरूप ठरवू – उघड करू शकते आणि अशा रीतीने उघडे झालेले त्यांचे खरे स्वरूप एखाद्याच्या बुद्धीला कितीही 'चमत्कारिक' वाटले तरी तो वास्तवांचा दोष नसून त्याकडे पाहणाऱ्या बुद्धीचाच तो दोष ठरतो; पण काही बुद्धिवादी इतके धूर्त असतात, की स्वत:चा दोष लपविण्यासाठी ते त्या वास्तवांचे संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांवरच दोष लादून मोकळे होतात! (कारण त्यांना वास्तवांना दोष देता येत नाही हे माहीत असते!) पण हा त्यांचा धूर्त डावपेच विज्ञानपद्धतीच्या निर्घृण हल्ल्यापुढे फार काळ टिकू शकत नाही. मग या लोकांपुढे स्वत:च्या आंधळ्या बुद्धीशी एकनिष्ठ राहायचे, की वास्तवांना सामोरे जाऊन विज्ञानपद्धतीशी एकनिष्ठ राहायचे, असा नवा पेचप्रसंग निर्माण होतो. खऱ्या विज्ञानवादी शास्त्रज्ञांची निष्ठा वास्तवाशी असल्यामुळे ते अर्थात खोटा बुद्धिवाद टाकून देऊन वास्तवांना सामोरे जातात व वैज्ञानिक पद्धतीशी एकनिष्ठ राहून वैज्ञानिक सत्याचे पुरस्कर्ते बनतात. याच्या उलट बुद्धिवाद्यांना स्वत:च्या बुद्धीची – मग ती कितीही आंधळी असेना का – प्रतारणा करणे जड जाते व ते आपल्या बुद्धीला शरण जाऊन वास्तवापासून दूर असलेल्या एका स्वत:च्या काल्पनिक वा खोट्या जगात वावरणे पसंत करतात. ते मग